# जनसंपर्क अधिकारी कार्यालय, ठाणे शहर पोलीस

THANE POLICE COMMISSIONERATE

**प्रेस नोट.** **दि. २२/०७/२०२६**

**“ शिक्षक महिलेची मालमत्ता हडप करण्याकरीता तिस अमानुषपणे मारहाण करून तीची मृत्युपत्रावर व मालमत्तेच्या कागदपत्रावर वारसदार म्हणुन स्वाक्षरी घेवुन तीस नाक व तोंड दाबुन जीवे ठार मारणारे दोन इसमांना गुन्हे शाखेकडुन अटक”**

---

कोळशेवाडी पोलीस ठाणे हददीत चिंचपाडा परिसरातील वेणुबाई पावशे शाळेतील शिक्षिका व एलआयसी एंजट म्हणुन काम करणारी अविवाहित महिला नामे संगिता मारूती चंदनशिवे वय ५३ वर्षे रा. मोहने आबिंवली ही महिला दि. १४/०७/२०२६ रोजी एलआयसी काढण्याचे कामानिमित्त शहापुर जि. ठाणे येथे जात असल्याचे घरी सांगुन ती घरातुन निघुन गेली व ती परत न आल्याने व तीचा कोठेही ठावठिकाणा मिळुन न आल्याने व मोबाईल फोन बंद असल्याने ती मिसिंग झालेबाबत कोळशेवाडी पोलीस ठाणे मानव मिसिंग क्रमांक १३३/२०२६ अन्वये सदर महिला बेपत्ता झालेबाबत दि. १५/०७/२०२६ रोजी तीचा भाउ नामे प्रविण मारूती चंदनशिवे यांनी तक्रार दिली होती.

सदर मानव मिसिंग तक्रारीबाबत मा.वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा, घटक–०३ कल्याणकडील पोलीस अधिकारी व अमंलदार यांनी समांतर तपास करत असताना सदर महिलेचा मृतदेह दि. १६/०७/२०२६ रोजी मेडीकल कॉलेजसमोरील, सिन्नर घोटी मार्गालगत, नाशिक रस्त्यावर आढळुन आला होता. त्याबाबत वाडीवऱ्हे पोलीस ठाणे, नाशिक ग्रामीण येथे गुन्हा रजि नं. २१३/२०२६ बीएनएस २०२३ चे कलम १०३(१), २३८,३(५) प्रमाणे खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला.

सदर गुन्हयाचा समांतर तपास करीत असताना सीसीटीव्ही फुटेज, तांत्रिक विश्लेषण व गुप्त बातमीदारामार्फत केलेल्या तपासात इसम नामे **१) दिगंबर भागुजी आव्हाड वय ४८ वर्षे धंदा–ब्रोकर रा. पॅन्टॉगॉन बिल्डींग, ए विंग, रूम नं. १११ कल्याण नाशिक हावये जवळ, आसनगाव व त्याचा साथीदार २) तुषार मुरलीधर रत्नपारखी वय ५२ वर्षे धंदा–चालक रा. जीएन–०३, रूम नं ६२ एनआरसी कॉलनी मोहने, आबिंवली ता.कल्याण जि.ठाणे यांना निष्पन्न करून** त्यांना ताब्यात घेवुन त्यांचेकडे सखोल चौकशी केली असता, त्यांनी चौकशीत सांगितले की, त्यांनी व त्यांचे इतर साथीदार नामे संतोष रमेश जाधव वय ४० वर्षे रा. शनी मदिंर मागे, पेठरोड नाशिक व विनोदचंद्र उर्फ संतोष पांडे रा.मोहने आबिंवली यांनी आपसात सगंनमत करून मयत महिला नामे संगिता मारूती चंदनशिवे हिस एलआयसी पॉलीसी घेण्याचा बहाणा करून आसनगाव याठिकाणी बोलावुन घेवुन यातील आरोपीत नामे दिंगबर भागुजी आव्हाड याचे पॅन्टॉगॉन बिल्डींग, ए विंग, रूम नं. १११ कल्याण नाशिक हावये जवळ, आसनगाव येथे भाडयाने घेतलेल्या घरी घेवुन जावुन मयत महिलेच्या नावे असलेल्या मालमत्तेच्या कागदपत्रावर तिचे मृत्युनंतर वारसदार म्हणुन **१) दिगंबर भागुजी आव्हाड वय ४८ वर्षे २)तुषार मुरलीधर रत्नपारखी वय ५२ वर्षे** यांचा उल्लेख करून, तिचे मृत्युपत्र तयार करुन सदर महिलेस मारहाण करून तीच्या जबरदस्तीने सदर कागदपत्रावर सहया घेवुन त्यांनतर तीचे तोंड व नाक दाबुन सदर महिला नामे संगिता मारूती चंदनशिवे जीवे ठार मारून तिला

कारमध्ये टाकुन एस.एम.बी.टी. मेडीकल कॉलेजसमोरील, सिन्नर घोटी मार्गालगत, नाशिक रस्त्यावर टाकुन दिल्याचे चौकशीत निष्पन्न झाले आहे. नमुद दोन्ही आरोपीत यांना पुढील कारवाई करीता वाडीवऱ्हे पोलीस ठाणे जि.नाशिक यांचेकडे हजर करण्यात येत आहे.

प्रस्तुत यशस्वी कामगिरी मा.श्री.आशुतोष डुंबरे, पोलीस आयुक्त, ठाणे शहर, मा. श्री. पंजाबराव उगले, पोलीस सह आयुक्त, (गुन्हे) ठाणे, मा. श्री. अमरसिंह जाधव, पोलीस उप आयुक्त, गुन्हे ठाणे ,व मा. श्री. शेखर बागडे सहा.पोलीस आयुक्त, (शोध १) गुन्हे शाखा, ठाणे यांच्या मार्गदर्शनाखाली कल्याण गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. अजित शिंदे, पो.नि./महेश काळे, सपोनि गणेश दळवी, पोउनि/किरण भिसे, सपोउपनि/बालाजी शिंदे, सपोउपनि दत्ताराम भोसले, पोहवा उल्हास खंदारे, पोहवा/सुधीर कदम, पोहवा/सचिन कदम, पोहवा विलास कडू, पोहवा/अदिक जाधव, पोहवा/गोरखनाथ पोटे, पोहवा विजय जिरे, पोहवा प्रशांत वानखेडे, पोहवा पांडुरंग भांगरे, पोहवा/सचिन भालेराव, पोना/प्रविण किनरे, पोकॉ./गुरूनाथ जरग, पोकॉ/सतिश सोनावणे, पोकॉ विनोद चन्ने, पोकॉ/गोरक्ष शेकडे पोकॉ/गणेश हरणे, पोकॉ/मिथुन राठोड, पोकॉ/जालिदंर साळुंखे, मपोकॉ/मंगला गावीत, चालक सपोउपनि/अमोल बोरकर यांनी केलेली आहे.

———ooo———